# सहायक अभियंता, श्रेणी-1
# सा. बां.उपविभाग क्र.4 ,पुणे-1
# यांचे कार्यालय

de.pwsubdiv4punr@gmail.com Phone : (020)-26061245

जा.क्र.सा.बां.उपवि-4/अशा/---218---/2020 दिनांक-16/06/2020

**प्रति,**

मा. उपवनसंरक्षक,
घोड प्रकल्प वनविभाग जुन्नर-410 502

**विषय :** वन (संवर्धन) अधिनियम,1980 अंतर्गत कलम 2 प्रमाणे सन 1980 पुर्वी अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणास परवानगी मिळणे बाबत. क्षेत्र 0.09 हेक्टर.
(नारायणगांव -ओझर- ओतूर रस्ता राज्य महामार्ग क्र.128. कि.मी. 55/0 ते कि.मी 73/400-लांबी 400 कि.मी.) पी.एन.35 जि. पुणे.) ***Proposal No.:-FP/MH/ROAD/45244/202.***

**संदर्भ:** 1.शासननिर्णय क्रमांक पिएलएन-2016/सीआर-(2511)/ नि-3 मंत्रालय, मुंबई दिनांक 1/12/2016.
2.महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाकडील महापरिवेश या वेबसाईटवर दिनांक 30/03/2020 रोजी Online सादर Form-A-Part-I प्रपत्र.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र.1 नुसार शासनाने पुणे जिल्हयातील **अष्टविनायक रस्त्यांची सुधारणा करणेसाठी हायब्रीड ॲन्यूटी (Hybrid -Annuity)** प्रकल्पांतर्गत रस्ते दुरुस्तीसाठी निर्णय पारित केलेला आहे. सदर प्रकल्प हा शासनाचा महत्त्वकांशी प्रकल्प आहे.

पुणे जिल्हयातील **अष्टविनायक रस्त्यांची सुधारणा करणे** या मध्ये नारायणगांव -ओझर- ओतूर राज्य महामार्ग-128 या रस्त्याचा समावेश आहे. प्रकरणातील नारायणगांव -ओझर- ओतूर रस्ता वनविभागाच्या टोपोशिट क्र. 47-E-16 (Surveyed 1975-76, 1980-81) वर नमुद असुन सन 1980 पुर्वी अस्तित्वात असलेला रस्ता आहे. टोपोशिट प्रमाणे सदर रस्त्याची रुंदी 7 ते 7.5 मीटर आहे. प्रस्तुत रस्ता हा ओझरच्या विघ्नहर गणपती देवस्थानकडे जाणारा महत्वाचा रस्ता असुन पुढे सदर रस्ता लेण्याद्री गणपती देवस्थान, तसेच छत्रपती शिवाजी महाराज जन्मभूमि शिवनेरी किल्ला जुन्नर तसेच दुस-या बाजुने ओतूर येथे राष्ट्रीय महामार्ग 222 ला मिळतो. या रस्त्यावर वर्षभर मोठया प्रमाणावर वाहतूक असते.

प्रस्तुत सन 1980 पुर्वी वनक्षेत्रात अस्तित्वात असलेला नारायणगांव -ओझर- ओतूर रस्ता साखळी क्रमांक 61/250 ते 61/550 या लांबी मध्ये (300 मी. X 3 मीटर=900 मी. एकुण 0.09 हे.) वन विभागाच्या क्षेत्रातुन जातो. सदर रस्ता मौजे धालेवाडी तर्फे हवेली ता जुन्नर जि पुणे या गावाच्या वन कंपार्टमेंट 45 सर्व्हे नं.146 गट नं.136 व सर्व्हे नं.35 गट नं.147 मधुन जातो. वनक्षेत्राचे ठिकाण उंच, वळणावर असल्याने व पुढे तिव्र उतार असल्याने तसेच यामुळे पुढील वाहने येता-जाता दिसत नसल्याने सदर ठिकाण आपघात स्थळ झालेले आहे. यास्तव सदर ठिकाणी रस्ता रुंद करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी 0.09 हेक्टर वनक्षेत्राची आवश्यकता आहे.

प्रकरणी या रस्त्याच्या रुंदीकरणास वनविभागाची परवानगी मिळण्यासाठी वन (संवर्धन) अधिनियम,1980 अंतर्गत कलम 2 प्रमाणे, विहीत प्रपत्र Form-A-Part-I वनविभागाकडील महापरिवेश या

वेबसाईटवर दिनांक 30/3/2020 रोजी Online सादर करण्यात आले आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास अनुक्रमांक ***Proposal No.:-FP/MH/ROAD/45244/2020*** मिळाला असुन वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत वनविभागास प्रस्ताव सादर करण्या बाबत Online सुचना प्राप्त आहे.

वनविभागाकडील महापरिवेश या वेबसाईटवर Online सादर करण्यात आलेल्या प्रपत्र **Form-A-Part-I** नुसार प्रस्ताव सादर करण्यास मिळालेल्या अनुमती प्रमाणे, वन (संवर्धन) अधिनियम,1980 अंतर्गत विहित नमुन्यातील 7 प्रतितील प्रस्ताव केएमएल सीडी-3 सह या सोबत सादर करण्यात आला आहे. तरी प्रकरणी शासनाकडील मंजूरीच्या अनुषंगाने आपणाकडील आवश्यक कार्यवाही होणेस विनंती आहे.

**सोबत**-वरील प्रमाणे (7 प्रती)

(श्री एस एस नगरारे)
सहायक अभियंता, श्रेणी-1
सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग, पुणे-1

**प्रतिलिपी :-** मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग पुणे, बी बरॅक, मध्यवर्ती इमारत परिसर, कॅम्प, पुणे-411001.यांना माहितीसाठी सादर.

17.6.2020
आवक/जावक लिपिक
उप वनसंरक्षक कार्यालय
घोड प्रकल्प वनविभाग
तहसिल कार्यालयाजवळ
जुन्नर, जि. पुणे.४१०५०२